# भुजबळ नॉलेज सिटी

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## <u>मराठी भाषा दिनाचा अहवाल</u>

**तारीख :- २६ फेब्रुवारी २०२२ (शनिवार)**

**व्याख्याते -: १) श्री. विनायकजी रानडे (संस्थापक: ग्रंथ तुमच्या दारी)**

**२) श्री. स्वानंद बेदरकर (प्रसिद्ध लेखक/कवी)**

**ठिकाण -: सेमिनार हॉल, मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, पॉलिटेक्निक, भुजबळ नॉलेज सिटी.**

**वेळ: सकाळी १०.४५ मि.**

---

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सूचनेनुसार, दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी कवी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते जेष्ठ मराठी साहित्यिक विष्णु वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज (जन्म दिवस २७ फेबुवारी) यांच्या जयंतीचे औचित्य साधुन “ मराठी भाषा दिवस” भुजबळ नॉलेज सिटी येथे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रंथालय फोरम च्या वतीने ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील यांनी प्रास्ताविक सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फार्मसी च्या विद्यार्थिनी कु. चंचल पगार आणि श्रुती मोराणकर यांनी केले. मराठी भाषा आणि सांस्कृतिक विविधता जोपासणे आणि त्याबाबत जागरुकता कशी निर्माण करता येईल या विषयावर श्री विनायकजी रानडे व श्री. स्वानंद बेदरकर यांनी त्यांचे मत मांडले तसेच श्री. स्वानंद बेदरकर यांनी कुसुमाग्रजांच्या कवितेचे वाचनही केले. या कार्यक्रमास ७९ विद्यार्थी आणि ५६ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

फार्मसी ग्रंथालय विभागामार्फत यानिमित्ताने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयात आलेल्या निबंधापैकी प्रथम क्रमांक देवयानी पाटील(एस.वाय.फार्म.डी),साक्षी पेखळे (एस.वाय.फार्म.डी.) आणि तृतीय क्रमांक गंगाधर मगर (एस.वाय.फार्म.डी.) यांना देण्यात आले.

महाविद्यालयातर्फे प्रा. श्री.राहुल साबळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता अध्यक्षा माननीय डॉ. सौ शेफाली भुजबळ व सर्व इन्स्टिट्यूट मधील प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले.

**कार्यक्रमाचे समन्वयक :-**

प्रा. श्री राहुल साबळे.

श्री. रवींद्र मानके सर

ग्रंथालय फोरम

# भुजबळ नॉलेज सिटी

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## <u>मराठी भाषा दिन २०२२</u>

---



*प्रमुख अतिथी श्री. स्वानंद बेदरकर यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर*



*प्रमुख अतिथी श्री. विनायकजी रानडे यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. विजय वाणी सर*



*प्रमुख अतिथी श्री स्वानंद बेदरकर यांनी मराठी भाषा आणि सांस्कृतिक विविधता जोपासणे आणि त्याबाबत जागरुकता कशी निर्माण करता येईल या विषयावर व्याख्यान देतांना...*




*कार्यक्रमाला उपस्थित असलेले अध्यक्षा माननीय डॉ. सौ शेफाली भुजबळ व सर्व इन्स्टिट्यूट चे प्राचार्य, आणि इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवृंद.*